शासकीय जमिनीवरील अतिक्रमणाबाबत तलाठी, मंडळ अधिकारी, तहसीलदार यांची जबाबदारी.

महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग,
परिपत्रक क्रमांक: एलईएन-1095/प्र.क्र.66/ज-1,
मंत्रालय, मुंबई 400 032, दिनांक 9 ऑगस्ट, 1995.

पहा :- (1) शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग, क्रमांक: एलईएन-2678/सीआर-782/29115/ग-3, दिनांक 3 डिसेंबर, 1979.

(2) शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग, क्रमांक: एलईएन-1082/6603/ग-3, दिनांक 17 फेब्रुवारी, 1982.

(3) शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग, क्रमांक: एलईएन-1082/33572/सीआर-1946/ग-3, दिनांक 4 ऑक्टोबर, 1982.

(4) शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग, क्रमांक: एलईएन-1086/1283/सीआर-3943/ग-3, दिनांक 20 फेब्रुवारी, 1987.

शासन परिपत्रक

शासकीय जमिनीवरील होणारी अतिक्रमणे रोखण्यासाठी व ती काढून टाकण्यासाठी करावयाच्या कार्यवाही बाबत शासनाने वेळोवेळी आदेश दिले असले तरी, त्याची परिणामकारक अंमलबजावणी होत नसल्याचे व शासकीय जमिनी-वरील, विशेषत्वेकरून गायरान व गावठाण जमिनीवर अतिक्रमणे होत असल्याबाबत गावक-यांनी संबंधित तहसिलदार व पोलीस स्टेशनला तक्रारी करूनही, संबंधित अधिकारी काहीच हालचाल करीत नाहीत वा अतिक्रमणे रोखण्या-बाबत कार्यवाही करीत नाहीत. अशा तक्रारी लोकप्रतिनिधींनी शासनास केल्या आहेत. अशा तक्रारींची शासनाने गंभीर दखल घेतली असून, शासनाचे असे आदेश आहेत की, गायरान व गावठाणसहीत सर्व जमिनींवरील अतिक्रमणे रोखण्यासाठी तलाठी, मंडळ अधिकारी व तहसीलदार यांनी वेळीच कार्यवाही करणे आवश्यक आहे. एवढेच नव्हे तर, पुरेपूर काळजी घेऊन देखील काही प्रकरणांत अतिक्रमणे झाली असल्यास, अशी अतिक्रमणे युध्दपातळीवर काढून टाकणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने ज्या तलाठी यांच्या हद्दीत व ज्या मंडळ अधिका-यांच्या अधिकार क्षेत्रात अशी अतिक्रमणे होत असतील तर ती तांतडीने रोखण्याच्या दृष्टीने त्यांनी युध्दपातळीवर कार्यवाही करावी. शासकीय जमिनीवर अतिक्रमणे झाल्यापासून तीन दिवसांच्या आत अशी अतिक्रमणे रोखण्यास तलाठी/मंडळ अधिकारी यांना अपयश आले तर, अशी अतिक्रमणे झाल्यापासून तीन दिवसांच्या आत ही बाब तहसिलदारांच्या नजरेस आणून देणे त्यांच्यावर बंधनकारक राहील. तहसिलदारांच्या नजरेस अशी अतिक्रमणे आणल्यावर, त्यांनी युध्द-पातळीवर अशी केलेली अतिक्रमणे दूर करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करणे आवश्यक राहील.

2. शासनाच्या असे देखील दृष्टोत्पत्तीस आले आहे की, ब-याच ठिकाणी जेथे शासनाने लाखो रुपये खर्च करून वृक्ष लागवड केली आहे, त्या ठिकाणी वृक्ष तोड करून, दांडगाईने अशा जमिनी वहितीखाली आणण्यात येत आहेत. अशा प्रकरणी देखील तहसिलदारांनी संबंधित वन अधिका-यांच्या नजरेस ह्या गोष्टी आणून त्यांना तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना करणे आवश्यक आहे.

जिल्हाधिकारी कार्यालय
- 6 SEP 1995

शा.म.मु.रोटा/एच-813(1)(1200-8-95)

(कृ.मा.प.)

3. वरील आदेशाचे पालन करण्यात कसुरदार आढळणा-यां तलाठी/मंडळ अधिकारी वा तहसिलदार यांचेवर शिस्तभंगाची कारवाई संबंधित जिल्हाधिका-यांनी करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

र. च. सिनहा,
अपर मुख्य सचिव,
महसूल व वन विभाग.

प्रति,